# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अकोला **P.S.(ठाणे):** सिटी कोतवाली
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0065 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/01/2024 15:35

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 17/01/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/01/2024
**Time From (वेळेपासून):** 17:04 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/01/2024 **Time (वेळ):** 15:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 020
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/01/2024 15:35 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** रसिक ऑटोमोबइल अकोला , नवीन काटन मार्केट कडुन ,चांदेकर चौक कडे जाणारा रस्ता
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रकाश गजानन दांदळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा कासली खुर्द, ता जि अकोला,सिटी कोतवाली,अकोला,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा कासली खुर्द, ता जि अकोला,सिटी कोतवाली,अकोला,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9604340819

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. महादेव उत्तम भगत | | | 1. मंडळ अधिकारी नेमणुक- , तहसील कार्यालय ता जि अकोला ,सिटी कोतवाली, अकोला,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

यावेळी डे - आफीसर HC किरसान ब नं 1553 यांनी अप नं 65/2024 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा नोंद केला नक्कल लेखी फिर्याद दि. 18/01/2024.मी, श्री. प्रकाश गजानन दांदळे, वय- 43 वर्षे , शिक्षण- इयत्ता 5 वी, व्यवसाय-शेती, रा. कासली खुर्द, ता. जि. अकोला मो.नं.-9604340819 समक्ष हजर राहून फिर्याद देतो की,मी, वर नमूद पत्यावर राहतो व शेतीचा व्यवसाय करून माझा व माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो. माझे वडीलोपार्जित मौजे कासली खुर्द सर्वे नं. 108 मधील 1.76 हेक्टर शेत हे माझे पणजोबा श्री. पंढरी दांदळे यांनी सन 1925 साली तोंडी व्यवहार करून श्री. अंबादास ताले यांचे कडुन विकत घेतले होते. ते शेत माझे पणजोबा पंढरी दांदळे व त्यानंतर माझे वडील श्री. गजानन दांदळे व त्यानंतर मी स्वतः वहीवाट करत आहे. मौजे कासली खुर्द सर्वे नं. 108 मधील 1.76 हेक्टर शेताचे कुळ कायद्या◌ानुसार माझे नावे होण्यासाठी मी दिनांक 30/09/2020 रोजी तहसिल कार्यालय अकोला येथे अर्ज केला होता. त्या अर्जावर कार्यवाही होउन दिनांक 28/12/2023 रोजी मा. तहसिलदार अकोला यांनी माझे नावे कुळाची नोंद करणेबाबत लेखी आदेश दिले आहेत.

मी सदर शेताच्या कुळाची फेरफार नोंद करण्यासाठी 10 दिवस अगोदर मंडळ अधिकारी श्री. महादेव भगत यांना भेटलो व त्यांना सदर आदेशाची अभिलेखावर नोंद होउन पुढील कायदेशीर प्रक्रिया होण्यासाठी विनंती केली. त्यावर अभिलेखावर नोंद करण्यासाठी मंडळ अधिकारी श्री. महादेव भगत यांनी मला 20,000/-(विस हजार) रूपये लाचेची मागणी केली. परंतु मला श्री. भगत यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांच्या विरूध्द कायदेशिर कारवाई होणेकरीता मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती येथील पोलीस निरीक्षक श्रीमती विजया पंधरे यांच्याकडे दिनांक 11/01/2024 रोजी मला व्यवस्थित लिहिता येत नसल्याने तोंडी तक्रार सांगितली.

पुढील कारवाई करीता पो.नि.विजया पंधरे मॅडम यांनी दोन शासकीय पंच बोलाविले व त्यांना माझा आणि पंचांचा असा ऐकमेकांचा परीचय करून दिला. त्यानंतर पो.नि. विजया पंधरे मॅडम यांच्या सांगण्यावरून पंचानी माझी तोंडी व संगणकावरील टंकलिखीत तक्रार एकच असल्याची खात्री करून टंकलिखीत तक्रारीवर पंच क्र.1 श्री. वाडेकर यांनी शेरा लिहून दोन्ही पंचांनी तक्रारीवर सह्या केल्या व समक्ष म्हणुन विजया पंधरे मॅडम यांनी सुध्दा सही केली. तक्रारीच्या अनुषंगाने लोकसेवक मंडळ अधिकारी श्री. महादेव भगत हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची दिनांक 11/01/2024 रोजी पडताळणी पुर्व पंचनाम्याप्रमाणे पंच क्र.1 व मला सुचना दिल्या व पडताळणी कार्यवाही क्र. 1 केली. सदर पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री. महादेव भगत यांची भेट झाल्यावर त्यांना मी माझे काम कधी होईल अशी विचारणा केली असता, त्यांनी मला '' तुझ काम मी अजुनही ईचकवुन टाकु शकतो...असे बोलले. त्यामुळे मी त्यांना पैश्यासंबंधाने विचारणा केली असता, त्यांनी ''काम झाल्यानंतर बघु'' असे म्हटल्यावरून सदर पडताळणी दरम्यान लाच रक्कमेबाबत स्पष्ट मागणी न केल्यामुळे पडताळणी कार्यवाही क्र. 2 आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर कारवाईबाबतचा सविस्तर पंचनामा तयार करण्यात आला.

आज दिनांक 17/01/2024 रोजी पडताळणी पुर्व पंचनाम्यातील सुचनांची उजळणी करून पडताळणी कार्यवाही क्र. 2 दरम्यान लोकसेवक श्री. महादेव भगत लाचेची मागणी करतात अगर कसे? या करीता पो.नि. विजया पंधरे मॅडम यांनी पंचाचे समक्ष पडताळणी करण्याचे अनुषंगाने मला, पंच क्र. 01 श्री.बनारसे यांच्यासह दुचाकीने लोकसेवक मंडळ अधिकारी श्री. महादेव भगत यांना भेटण्याकरीता रवाना केले. सदर पडताळणी दरम्यान लोकसेवक महादेव भगत यांनी पंचाचे समक्ष मला ''तिस आना नाई ह पाय मंजुर करायचे पन्नसा देवुन रायला.... तुम्ही रहा बाजुले यायले नेतो मी यायचे समोर घेतो काहो बॉ...'' असे म्हटले. त्यावर मी त्यांना '' बर मंग मी सध्या विस आणतो...'' असे म्हटले. त्यावर श्री. भगत यांनी ''जर पंचेचाळीस घेतले पाच कमी जरी घेतले ना मी.... तुमचे काम फुकट करील... पुरे पन्नासच मोजुन घेतो... माहे मागचं फिरून रायल ते की माय नांव त्याच्यांत अंदर आना एकदा.... (इशा-याने हाताने 3 बोटे दाखवुन) येवढे लागतील...'' असे म्हणुन तिस हजार रूपये लाच मागणी केल्याचे पंचाचे समक्ष निष्पन्न झाले. त्यावर मी सध्याचे ''माहाजवळ विराच हजार.. ''असे म्हणुन लाच रक्कम लगेच

घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन लागलीच पो.नि. विजया पंधरे मॅडम यांनी सर्वानुमते सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरवुन मला सापळा कार्यवाहीत वापरण्यात येणारी लाच रक्कम हजर करण्यास सागीतले असता मी माझ्या जवळील 500 रुपये दराच्या 40 चलनी नोटा एकुण 20,000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक पो.नि. विजया पंधरे मॅडम यांनी पंच क्र.1 श्री.बनारसे यांना वाचण्यास सांगुन पंच क्र.2 वावरे यांना को-या कागदावर लिहिण्यास लावले व त्यावर पंचांनी व पो.नि.पंधरे मॅडम यांनी सहया केल्या.
त्या नंतर पो.नि. विजया पंधरे मॅडम यांच्या सुचनेवरून सविस्तर सापळापुर्व पंचनामा केला व पो.अंम. वैभव जायले यांनी 17/04 वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करून माझे शर्टाच्या आतमध्ये ठेउन दिला. त्यानंतर मी व पंच असे दोघे मंडळ अधिकारी श्री. महादेव भगत यांची भेट घेण्याकरीता अकोला शहरातील चांदेकर चौक येथील रसिक ऑटोमोबाईल येथे रवाना झालो. त्यानंतर आमच्या पाठोपाठ आपण सापळा पथकातील इतर कर्मचारी व अधिकारी आणि पंच क्र.2 हे सरकारी वाहनाने तेथे येवुन आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 श्री. बनारसे त्या सांगितलेल्या ठिकाणी पोहोचण्या अगोदर श्री. भगत हे त्यांच्या दिव्यांगाची मोटर सायकलीवर बसुन हजर होते व त्यांची मोटर सायकल सुरुच होती. श्री. भगत यांच्या जवळपास मी व पंच जाताच त्यांनी मला ''तुमी कोणाले पाहुन राहीले..?'' असा प्रश्न विचारला. त्यावर मी त्यांना ''नही नही म्या म्हटलं तुमी कुठी गेले असे दिसले नाही भसकन...... विसच हजाराचं जमलं'' असे म्हणत असतांना त्यांनी मला त्यांच्या मोटर सायकलच्या हॅन्डल जवळील डिक्की उघडली व बोटाने इशारा करून त्यात लाच रक्कम टाकण्यास सांगितले. मी लाच रक्कम 20,000/- रूपये त्यांच्या डिक्कीमध्ये टाकताच श्री. भगत यांनी त्यावर ''ठिक आहे नंतर पाहु....येतो मंग'' असे म्हणुन त्यांच्या मोटर सायकलने निघत असतांना मी सापळा पथक यांना लाच स्विकारल्याचा नियोजित इशारा केला. त्याचवेळी पो.नि. पंधरे मॅडम व त्यांचा स्टाफ श्री. भगत साहेबांना ताब्यात घेण्यासाठी आमचे जवळ येत असतांनाच श्री भगत साहेब हे स्विकारलेल्या लाच रक्कमेसह चांदेकर चौकाकडे जाणा-या रस्त्याच्या दिशेने वेगाने त्यांचे मोटर सायकलने वेगाने निघुन गेले. लागलीच सापळा पथक लगेच माझ्या जवळ आले पो.अंम.वैभव जायले यांनी व्हॉईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतले. ती वेळ 17/24 वाजताची होती. पो.नि. पंधरे व सापळा पथकाने तात्काळ श्री महादेव भगत यांचा पाठलाग करून शोध घेतला, परंतु ते मिळुन आले नाहीत. त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. कार्यालय अकोला येथे हजर होवुन पुढील कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला.
तरी लोकसेवक श्री. महादेव उत्तम भगत, वय-53 वर्षे , पद- मंडळ अधिकारी नेमणुक- तहसील कार्यालय ता. जि. अकोला यांनी मला कुळाची नोंद अभिलेखावर नोंद करण्यासाठी तसेच माझे शेत जमिनीचे गैरअर्जदार श्री. ताले यांचा शेतजमीन सातबारा वर नोंद घेण्याबाबतचा अर्ज किंवा आदेश आल्यावर त्यावर कुठलीही कार्यवाही न करण्यासाठी आर्थिक गैरफायदा मिळविण्याकरीता स्वतःचे पदाचा गैरवापर करून दिनांक 17/01/2024 रोजी पडताळणी कार्यवाही क्र.02 दरम्यान तडजोडीअंती 30,000/-रू लाचेची मागणी करून व आयोजित सापळा कारवाई दरम्यान पहीला टप्पा म्हणुन 20,000/-रूपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली असल्याने त्याचे विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.वरील प्रमाणे माझी फिर्याद लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन ती मी प्रिंट काढुन झालेवर वाचुन पाहिली असता माझे सांगण्याप्रमाणे बरोबर टंकलिखीत केली असुन खरी आहे. कार्यवाही व्हावी समक्ष फिर्यादीची सही एस डी मराठीत पंधरे पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. अमरावती.वरुन मा पो नि सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा नोंद केला

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sunil rajaramji waydande(I (Inspector)) / POBN74988 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)
सिटी कोतवाली
**Name** (नाव): sunil rajaramji wayd
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN74988

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)